आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

८ जानेवारी २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रस्ते अपघातातल्या जखमींसाठी दीड लाखापर्यंत विनारोकड उपचार योजना सुरु, हिट अँड रनमधल्या मृतांच्या वारसांना २ लाख रुपयांची मदत

- मराठी आणि प्राकृतला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे त्याअनुषंगानं मिळणारे लाभ देण्याची राज्याची केंद्र सरकारकडे मागणी

- गुजरातमध्ये झालेल्या अपघातात पालघरच्या तीन तरुणांचा मृत्यू, चार जण गंभीर जखमी

**आणि**

- सुमारे १० लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या दोन नक्षलवादी महिलांचं गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण

**<><><><><>**

रस्ते अपघातातल्या जखमींसाठी विनारोकड उपचार देणारी योजना केंद्र सरकारनं आजपासून सुरू केली. याअंतर्गत दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचारांसाठी कोणतीही रोख रक्कम द्यावी लागणार नाही. याशिवाय हिट अँड रनमध्ये मृत्यू झालेल्यांच्या वारसांना २ लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत दिली जाईल. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी नवी दिल्लीत आज ही घोषणा केली.

गेल्यावर्षभरात देशभरात रस्ते अपघातात १ लाख ८० हजार व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यापेैकी ३० हजार जण हेल्मेट न घातल्यानं मृत्यूमुखी पडले. मृतांमध्ये ६६ टक्के तरुण होते अशी माहिती गडकरी यांनी दिली.

**<><><><><>**

मराठी आणि प्राकृतला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे इतर लाभ देण्याची विनंती राज्य सरकारनं आज केंद्राला केली. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांची भेट घेतली. त्यावेळी यासंदर्भात ४ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्राची प्रत शेखावत यांनी सामंत यांना सुपूर्द केली. मराठी, पाली, प्राकृत, आसामी आणि बांग्ला या भाषांना अभिजात दर्जा दिल्याचा उल्लेख त्यात आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे लाभ मिळण्यासाठी आवश्यक प्रस्ताव २-३ आठवड्यात सादर करु असं सामंत म्हणाले.

**होल्ड- बाईट - उदय सामंत**

महाराष्ट्रासह इतर राज्यात तसंच विदेशातही मराठी भाषेचं जतन संवर्धन करण्यासाठी विविध प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती राज्य सरकारनं नियुक्त केलेल्या समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मुळे यांनी दिली.

**होल्ड - बाईट - मुळे**

**<><><><><>**

देशाचं आणि समाजाचं नुकसान करत असलेल्या, न दिसणाऱ्या शत्रूशी लढण्यासाठी, समाजानं एकत्र येणं आवश्यक आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज नवी मुंबई पोलीस आयुक्तालयानं वाशी इथं आयोज्त केलेल्या “नशामुक्त नवी मुंबई” अभियानाचं उद्घाटन करताना बोलत होते. अंमली पदार्थांच्या माध्यमातून काही लोक समाज पोखरण्याचं दुष्कर्म करत आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी सजग राहा, सैनिक म्हणून पुढं या, हीदेखील एक प्रकारची देशभक्ती आणि समाजाची सेवा आहे, असं फडनवीस म्हणाले.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक, प्रख्यात अभिनेता आणि “नशामुक्त नवी मुंबई” या उपक्रमाचे आयकॉन जॉन अब्राहम, स्थानिक लोक प्रतिनिधी, नशामुक्तीचं काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयीन विद्यार्थी, आदी उपस्थित होते.

मुंबईत भायखळा इथल्या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणी संग्रहालयात असलेल्या डॉ.भाऊ दाजी लाड संग्रहालयाचं नूतनीकरण मुंबई महानगरपालिकेनं केलं आहे. या नूतनीकरण केलेल्या संग्रहालयाचं लोकार्पणही आज मुख्यमंत्र्यांनी केलं.

**<><><><><>**

शासकीय रुग्णालयात रुग्णांसाठी अधिकाधिक दर्जेदार आणि अद्ययावत सेवा देण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिल्या आहेत. औषधं तसंच अन्नपदार्थांमधल्या भेसळीला प्रतिबंध करण्यासाठी काटेकोर उपाययोजना करण्याचे आदेशही त्यांनी दिले. वैद्यकीय शिक्षण, अन्न आणि औषध प्रशासन तसंच सामान्य प्रशासन विभागाच्या पुढील १००दिवसांच्या आराखड्याचा आढावा घेताना ते मुंबईत बोलत होते.

दुध भेसळ रोखणे, मंदिर आणि देवस्थानातल्या प्रसादाची गुणवत्ता तपासणीची कामे प्राधान्यानं करा, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

नागपूरमध्ये १२ ते १४ जानेवारी दरम्यान राज्यस्तरीय मराठी भाषाप्रेमी शैक्षणिक साहित्य संमेलनाचं  आयोजन करण्यात आलं  आहे.नूतन भारत विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, विदर्भ साहित्य संघ, नागपूर महानगरपालिका शिक्षण विभाग आणि कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचं आयोजन करण्यात आलं  आहे.१२ जानेवारी रोजी

संध्याकाळी ६ वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग इथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते संमेलनाचं उद्घाटन होणार आहे.

**<><><><><>**

पालघरच्या तीन तरुणांचा आज सकाळी गुजरातमध्ये झालेल्या अपघातात मृत्यू झाला. हे तिघेही राजस्थानच्या अजमेर शरीफ दर्गा इथे गेले होते. तिथून परतताना वाटेत गुजरात इथे अंकलेश्वर जिल्ह्यात त्यांच्या गाडीला ट्रकची धडक बसून अपघात झाला. या अपघातात अन्य चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

सुमारे १० लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या दोन नक्षलवादी महिलांनी आज गडचिरोलीत पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. शामला उर्फ लीला झुरु पुडो, आणि काजल उर्फ तिम्मी मंगरु वड्डे अशी त्यांची नावं आहेत.

शामला पुडो ही एटापल्ली तालुक्यातल्या गट्टेपल्ली इथली रहिवासी असून २००२ मध्ये ती चामोर्शी दलममध्ये सहभागी झाली. सध्या ती कंपनी क्रमांक १० ची सेक्शन कमांडर होती. तिच्यावर २१ चकमकी, ६ जाळपोळ, आणि इतर १८, अशा एकूण ४५ गुन्ह्यांची नोंद आहे. शासनानं तिच्यावर ८ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केले होतं.

काजल वड्डे २०१८ पासून भामरागड दलममध्ये कार्यरत होती. एकूण ८ गुन्ह्यांची नोंद आहे. शासनानं तिच्यावर दोन लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

**<><><><><>**

ऊसतोड कामगारांसाठी कारखाना परिसरात साक्षरता वर्ग सुरू करण्याचे आदेश साखर आयुक्तांनी सर्व साखर कारखान्यांना दिले होते. त्यामुळे राज्यात

गाळप हंगाम सुरू केलेल्या ९६ सहकारी आणि ९३ खाजगी अशा १८९ साखर कारखान्यांच्या परिसरात साक्षरता वर्ग सुरू झाले आहेत.
यात आत्तापर्यंत ४ लाख ९२हजार निरक्षरांची ऑनलाईन नोंदणी झाली आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व खासगी रुग्णालयांची तपासणी आरोग्य विभागाकडून केली जाणार आहे. पुणे विभागाचे आरोग्य उपसंचालक डॉक्टर राधाकिशन पवार यांनी नियमावली तयार केली आहे. ही तपासणी १५ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी महापालिकेचे आरोग्यप्रमुख,जिल्हा आरोग्य अधिकारी आणि शल्यचिकित्सक यांना दिले आहेत. रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकांची निकषाप्रमाणे संख्या आणि रुग्णालयाबाहेर लावलेले दरपत्रक या बाबींची तपासणी केली जाणार आहे.

**<><><><><>**

धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्गावर मोरकरंजा गावाच्या शिवारात पोलिसांनी सापळा रचून गुजरातमधे दारुची तस्करी करणाऱ्या एका वाहनाला ताब्यात घेतलं, आणि ७ लाख ९१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी विसरवाडी पोलिस ठाण्यात संशयित आरोपी प्रविण नथ्थू पाटील याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यातल्या साक्री तालुक्यात म्हसदी इथं पोलिसांनी एका वाहनासह ७७ लाख २० हजार रुपये किंमतीचा बनावट मद्यसाठा जप्त केला आहे. हा मद्यसाठा बेकायदेशीरपणे विक्री करण्याच्या उद्देशानं म्हसदी गावातल्या जयेश गुंजाळ यानं आणला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती, त्यानुसार त्यांनी ही कारवाई केली. या प्रकरणी गुंजाळविरोधात गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कुडाळ इथं २७ व्या बाबा वर्दम स्मृती नाट्य महोत्सवाला काल रात्री सुरुवात झाली. ज्येष्ठ अभिनेते प्रसाद पंडित यांच्या हस्ते या महोत्सवाचं उदघाटन झालं. नाट्यकर्मी बाबा वर्दम यांच्या जन्मदिनानिमित्तानं दरवर्षी या नाट्यमहोत्सवाचं आयोजन करण्यात येतं. सात ते तेरा  जानेवारी दरम्यान होणाऱ्या या नाट्य महोत्सवात राज्यासह गोवा, मध्यप्रदेश आदी राज्यांमधली निवडक सात नाटकं सादर होणार असल्याची माहिती आमच्या बातमीदारानं दिली आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी कोकणात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली. मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किंचित घट झाली. सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं ८ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, राज्यात  सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**